## प्रेसनोट

दि. २८/०३/२०२४

वरसगांव ग्रामपंचायत कार्यालय, ता. वेल्हा, जि. पुणे येथील ग्रामसेवकावर लाच स्विकारले प्रकरणी कारवाई.

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक | वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे शहर. गु.र.नं. १२८/२०२४. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन १९८८ चे कलम ७. |
| तक्रारदार | पुरुष, वय - ४५ वर्षे |
| आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय | विठ्ठल वामन घाडगे, वय ४४ वर्ष, पद — ग्रामसेवक, वरसगांव ग्रामपंचायत, तालुका - वेल्हा, जि. पुणे (वर्ग-३) |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | ५,०००/- रुपये |
| तडजोडीअंती लाच मागणी रक्कम | ५,०००/- रुपये |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- रुपये (पाच हजार रुपये) |
| पडताळणी दिनांक | २७/०३/२०२४ |
| सापळा दिनांक | २७/०३/२०२४ |

ठिकाण :- मातोश्री वृद्धाश्रमाचे भिंतीलगत कॉर्नरचे पान टपरीसमोर, विठ्ठल मंदिर भाजी मंडई, कर्वे रोड, कर्वेनगर, पुणे.

थोडक्यात माहिती :-

यातील तक्रारदार यांचे मौजे वरसगांव ता. वेल्हे, जि. पुणे येथे वडीलोपार्जीत मिळकत घर क्र. २५ व घर नं. २६ आहे. सदर मिळकतीच्या क्षेत्राच्या नोंदी दुरुस्त करुन, मिळकत घर नं. २५ च्या ८ अ उता-यावर तक्रारदार यांचे आईचे व मिळकत घर नं. २६ च्या ८ अ उता-यावर तक्रारदार यांचे स्वतःचे नाव दुरुस्त करुन संगणीकृत ८ अ चा उतारा देणेसाठी लोकसेवक विठ्ठल घाडगे यांनी ५,०००/- रुपयांची लाच मागणी केल्याची तक्रार तक्रारदार यांनी ला.प्र.वि. येथे दिली होती.

सदर तक्रारीची पडताळणी पंचासमक्ष केली असता, लोकसेवक विठ्ठल वामन घाडगे यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे मिळकत घर क्र. २५ व २६ च्या ८ अ उता-यावर आईचे व तक्रारदार यांचे नावाची नोंद घेण्यासाठी व संगणीकृत उतारा तक्रारदार याना देण्यासाठी पंचासमक्ष ५,०००/- रुपयाची लाच रक्कमेची मागणी करुन, लोकसेवक विठ्ठल घाडगे यानी तक्रारदार यांचेकडून रुपये ५,०००/- (पाच हजार रुपये) लाच रक्कम पंचासमक्ष स्विकारल्यावर त्याना ताब्यात घेण्यात आले असून, त्यांचेविरुद्ध वारजे माळवाडी पोलीस स्टेशन, पुणे येथे वरील प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्ह्याचा ला.प्र.वि. पुणे येथील पोलीस निरीक्षक विद्युलता चव्हाण तपास करीत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक डॉ. शीतल जानवे, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. अमोल तांबे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांनी केले आहे.

१) हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२) अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३) व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४) व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५) ई-मेलआयडी - पुणे **dyspacbpune@mahapolice.gov.in**
६) वेबसाईट - **www.acbmaharashtra.gov.in**
७) ऑनलाईन अॅप तक्रार - **www.acbmaharashtra.net.in**

(नितिन जाधव)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.